# श्रीज्ञानेश्वरी-नित्यपाठ

॥ श्री गणेशाय नमः ॥

ॐ नमो जी [१]आद्या । [२]वेदप्रतिपाद्या ।
जय जय [३]स्वसंवेद्या । आत्मरूपा ॥१॥ अध्याय १ ओंवी १

देवा तूं चि गणेश । सकलमतिप्रकाश ।
म्हणे निवृत्तिदास । [४]अवधारिजो ॥२॥ अ.१ ओं.२

आतां [५]अभिनववाग्विलासिनी । [६]जे चातुर्यार्थकलाकामिनी ।
[७]ते श्रीशारदा विश्वमोहिनी । नमिली मियां ॥३॥ अ. १।२१

मज हृदयीं सद्गुरु । जेणें तारिलों हा संसारपूरु ।
म्हणौनि विशेषें अत्यादरु । विवेकावरी ॥४॥ अ. १।२२

या [८]उपाधिमाजीं गुप्त । चैतन्य असे [९]सर्वगत ।
तें तत्त्वज्ञ संत । स्वीकारिती ॥५॥ अ. २।१२६

उपजे तें नाशे । नाशलें पुनरपि दिसे ।
हें [१०]घटिकायंत्र तैसें । परिभ्रमे गा ॥६॥ अ. २।१५९

जैसें मार्गें चि चालतां । [११]अपावो न [१२]पवे सर्वथा ।
कां दीपाधारें वर्ततां । [१३]नाडळिजे ॥७॥ अ. २।१८७

तयापरी पार्था । स्वधर्में [१४]राहाटतां ।
सकळकामपूर्णता । सहजें होय ॥८॥ अ. २।१८८

सुखीं संतोषा न यावें । दुःखीं [१५]विषादा न [१५]भजावें ।
आणि लाभालाभ न धरावे । मनामाजीं ॥९॥ अ. २।२२६

Scanned by CamScanner

आपणयां उचिता । स्वधर्मे राहाटतां ।
जें पावे तें [१]निवांता । साहोनि जावें ॥१०॥ अ. २।२६

आम्ही समस्त हि [२]विचारिलें । तंव ऐसें चि हें मना आलें ।
[३]जे न सांडिजे तुवां आपुलें । [४]विहित कर्म ॥११॥ अ. २।२६

परि कर्मफळीं आस न करावी । आणि कुकर्मी संगति न व्हावी ।
हे सत्क्रिया चि आचरावी । [५]हेतुविण ॥१२॥ अ. २।२६

तूं योगयुक्त होउनि । फळाचा संग टाकुनि ।
मग अर्जुना चित्त देउनी । करीं कर्मे ॥१३॥ अ. २।२६

परि [६]आदरिलें कर्म दैवें । जरी समाप्तीतें पावे ।
तरी विशेषें तेथ तोषावें । हें हि नको ॥१४॥ अ. २।२६

कीं निमित्तें कोणे एके । तें सिद्धी न [७]वचतां ठाके ।
तरी तेथींचेनि [८]अपरितोखें । क्षोभावें ना ॥१५॥ अ. २।२६

देखें [१०]जेतुलालें कर्म निपजे । तेतुलें [११]आदिपुरुषीं अर्पिजे ।
तरी परिपूर्ण सहजें । जाहलें जाण ॥१६॥ अ. २।२७

म्हणोनि जें जें उचित । आणि [१२]अवसरेंकरूनि प्राप्त ।
तें कर्म हेतुरहित । आचरें तूं ॥१७॥ अ. ३।७८

देखें [१३]अनुक्रमाधारें । स्वधर्म जो आचरे ।
तो मोक्ष तेणें व्यापारें । निश्चित पावे ॥१८॥ अ. ३।८०

स्वधर्म जो बापा । तो नित्ययज्ञ जाण पां ।
म्हणोनि वर्ततां येथ पापा । [१४]संचारु नाहीं ॥१९॥ अ. ३।८१

हा निजधर्म जैं सांडे । आणि कुकर्मी [१५]रति घडे ।
तैं चि बंध पडे । सांसारिक ॥२०॥ अ. ३।८२

Scanned by CamScanner

म्हणोनि स्वधर्मानुष्ठान। तें अखंड यज्ञयाजन।
जो करी तया बंधन। [१]कहीं चि न घडे ॥२१॥ अ. ३।८३

अगा जया जें [२]विहित। तें ईश्वराचें मनोगत।
म्हणौनि केलिया [३]निभ्रांत। सांपडे चि तो ॥२२॥ अ. १८।९११

तें विहित कर्म पांडवा। आपुला [४]अनन्य [५]वोलावा।
आणि हे चि परम सेवा। मज सर्वात्मकाची ॥२३॥ अ. १८।९०६

तया सर्वात्मका ईश्वरा। [६]स्वकर्मकुसुमांची वीरा।
पूजा केली होय अपारा। तोषालागीं ॥२४॥ अ. १८।९१७

तें क्रियाजात आघवें। जें जैसें निपजेल स्वभावें।
तें भावना करोनि करावें। माझिया [७]मोहरा ॥२५॥ अ. ९।४००

आणि हें कर्म मी कर्ता। कां आचरेन या [८]अर्था।
ऐसा अभिमान [९]झणें चित्ता। रिघों [९]देसी ॥२६॥ अ. ३।१८७

तुवां [१०]शरीरपरा नोहावें। [११]कामनाजात सांडावें।
मग अवसरोचित भोगावे। भोग सकळ ॥२७॥ अ. ३।१८८

तूं मानसा नियम करीं। निश्चळु होय अंतरीं।
मग कर्मेंद्रियें व्यापारीं। वर्ततु सुखें ॥२८॥ अ. ३।७६

[१२]परिस पां [१३]सव्यसाची। मूर्ति [१४]लाहोनि देहाची।
[१५]खंती करिति कर्माची। ते [१६]गांवढे गा ॥२९॥ अ. ३।१४५

देख पां जनकादिक। कर्मजात [१७]अशेख।
न सांडितां, मोक्षसुख। पावते जाहले ॥३०॥ अ. ३।१५२

१ कधींच. २ कर्तव्य. ३ निःसंशय. ४ एकच. ५ जीवन. ६ स्वकर्मरूप फुलांची.
७ मार्गाला. ८ फळासाठीं. ९ रिघूं देऊं नको. १० देहाच्या ठिकाणीं आसक्त. ११ सर्व कामना.
१२ ऐक. १३ अर्जुना. १४ प्राप्त होऊन. १५ कंटाळा. १६ अडाणी. १७ संपूर्ण.

Scanned by CamScanner

देखें [1]प्राप्तार्थ जाहले । जे निष्कामता पावले ।
तयां हि कर्तव्य असे उरलें । [2]लोकांलागीं ॥३१॥ अ. ३।१५५

मार्गीं अंधासरिसा । पुढें [3]देखणा हि चाले जैसा ।
अज्ञाना प्रगटावा धर्म तैसा । आचरोनि ॥३२॥ अ. ३।१५६

एथ [4]वडील जें जें करिती । तया नाम धर्म ठेविती ।
तें चि [5]येर [6]अनुष्ठिती । सामान्य सकळ ॥३३॥ अ. ३।१५८

हें ऐसें असे स्वभावें । म्हणोनि कर्म न [7]संडावें ।
विशेषें आचरावें । लागे संतीं ॥३४॥ अ. ३।१५९

दीपाचेनि प्रकाशें । गृहींचे [8]व्यापार जैसे ।
देहीं [9]कर्मजात तैसें । योगयुक्ता ॥३५॥ अ. २।४९

तो कर्में करी सकळें । परी कर्मबंधा [10]नाकळे ।
जैसें न [11]सिंपे जळीं जळें । [12]पद्मपत्र ॥३६॥ अ. ५।५०

तया हि देह एक [13]कीर [14]आथी । लौकिकीं सुखदुःखी तयातें म्हणती ।
परी आम्हातें ऐसी प्रतीति । परब्रह्म चि हा ॥३७॥ अ. ६।४०८

देह तरी [15]वरिचिलीकडे । आपुलिया परी हिंडे ।
परी [16]बैसका न मोडे । मानसींची ॥३८॥ अ. १३।४८६

अर्जुना समत्व चित्ताचें । तें चि सार जाण योगाचें ।
जेथ मन आणि बुद्धीचें । ऐक्य [14]आथी ॥३९॥ अ. २।२७३

देखें अखंडित प्रसन्नता । [14]आथी जेथ चित्ता ।
तेथ [17]रिघणें नाहीं समस्तां । संसारदुःखां ॥४०॥ अ. २।३३८

---

१ कृतार्थ. २ लोकांसाठीं. ३ डोळस. ४ थोर; श्रेष्ठ. ५ इतर. ६ आचरण करतात. ७ सोडावें. ८ व्यवहार. ९ सर्व कर्में. १० सांपडत नाहीं. ११ भिजे. १२ कमळाचें पान. १३ खरोखर. १४ आहे. १५ बाह्यतः. १६ बैठक. १७ प्रवेश करणें.

Scanned by CamScanner

जैसा अमृताचा [1]निर्झरु। प्रसवे जयाचा जठरु॥
तया क्षुधेतृषेचा [2]अडदरु। [3]कहीं चि नाहीं॥४१॥ अ. २।३३९

तैसें हृदय प्रसन्न होये। तरी दु:ख [4]कैचें [5]कें आहे।
तेथ [6]आपैसी बुद्धि राहे। परमात्मरूपीं॥४२॥ अ. २।३४०

जैसा [7]निर्वातींचा दीपु। सर्वथा नेणे कंपु।
तैसा स्थिरबुद्धि स्वस्वरूपु। योगयुक्त॥४३॥ अ. २।३४१

जया पुरुषाच्या ठायीं। कर्माचा तरी खेदु नाहीं।
आणि [8]फलापेक्षा कंहीं। [9]संचरेना॥४४॥ अ. ४।१०३

आणि हें कर्म मी करीन। अथवा [10]आदरिलें सिद्धी नेईन।
येणें संकल्पेंहि जयाचें मन। विटाळे ना॥४५॥ अ. ४।१०४

ज्ञानाग्नीचेनि मुखें। जेणें जाळिलीं कर्में [11]अशेखें।
तो परब्रह्मचि [12]मनुष्यवेखें। वोळख तूं॥४६॥ अ. ४।१०५

तें ज्ञान पैं गा बरवें। जरी मनीं [13]आथी जाणावें।
तरी संतां यां भजावें। सर्वस्वेसीं॥४७॥ अ. ४।१६४

जे ज्ञानाचा [14]कुरुठा। तेथ सेवा हा [15]दारवंटा।
तो स्वाधीन करीं [16]सुभटा। [17]वोळगोनि॥४८॥ अ. ४।१६५

तरी तनुमनुजीवें। चरणासी लागावें।
आणि [18]अगर्वता करावें। दास्य सकळ॥४९॥ अ. ४।१६६

मग [19]अपेक्षित जें आपुलें। तेही सांगती [20]पुसिलें।
जेणें अंत:करण बोधलें। संकल्पा न ये॥५०॥ अ. ४।१६७

---

१ झरा. २ धाक; भीति. ३ कधींच. ४ कसलें. ५ कोठें. ६ आपोआप. ७ निवाऱ्यांतला. ८ फलेच्छा. ९ प्रवेश करीत नाहीं. १० आरंभिलें. ११ संपूर्ण. १२ मनुष्यवेशानें (मनुष्यरूपानें). १३ आहे. १४ घर. १५ उंबरठा. १६ चांगल्या योद्ध्या (अर्जुना). १७ सेवा करून. १८ अभिमान सोडून. १९ हवें असलेलें. २० विचारलें (असतां).

Scanned by CamScanner

ते वेळीं [१]आपणपेयां सहितें । [२]इयें अशेषेंहि [३]भूतें ।
माझ्या स्वरूपीं अखंडितें । देखसी तूं ॥५१॥ अ. ४।१

ऐसें ज्ञानप्रकाशें [४]पाहेल । तैं मोहांधकारु जाईल ।
जैं गुरुकृपा होईल । पार्था गा ॥५२॥ अ. ४।१

जरी [५]कल्मषाचा आगरु । तूं भ्रांतीचा सागरु ।
[६]व्यामोहाचा डोंगरु । होऊनि अससी ॥५३॥ अ. ४।१

तरी ज्ञानशक्तिचेनि [७]पाडें । हें आघवें चि गा [८]थोकडें ।
ऐसें सामर्थ्य असे [९]चोखडें । ज्ञानीं इये ॥५४॥ अ. ४।१

[१०]मोटकें गुरुमुखें [११]उदैजत दिसे । हृदयीं स्वयंभचि असे ।
प्रत्यक्ष [१२]फावों लागे तैसें । [१३]आपैसयाचि ॥५५॥ अ. ९।४

सांगें अग्नीस्तव [१४]धूम होये । तिये धूमीं काय अग्नि आहे ।
तैसा विकारु हा मी नोहें । जरि विकारला असे ॥५६॥ अ. ७।५

देह तंव [१५]पांचाचें जालें । हें कर्माचे [१६]गुणीं गुंथलें ।
भवंतसे चाकीं [१७]सूदलें । जन्ममृत्यूच्या ॥५७॥ अ. १३।११

हें [१८]काळानळाच्या तोंडीं । घातली लोणियाची उंडी ।
माशी पांख [१९]पाखडी । तंव हें सरे ॥५८॥ अ. १३।११

या देहाची हे दशा । आणि आत्मा तो एथ ऐसा ।
पैं नित्य सिद्ध [२०]आपैसा । अनादिपणें ॥५९॥ अ. १३।११

[२१]सकळ ना [२२]निष्कळु । अक्रिय ना क्रियाशीळु ।
कृश ना स्थूळु । निर्गुणपणें ॥६०॥ अ. १३।११

---

१ आपणासहित. २ हीं. ३ प्राणिमात्र. ४ उजाडेल. ५ पापाचा. ६ मोहाचा. ७ योग्यतें
८ लहान. ९ शुद्ध. १० अल्प. ११ उगवतांना दिसतें. १२ अनुभवास येऊं लाग
१३ आपोआप. १४ धूर. १५ पंचमहाभूतांचें. १६ दोऱ्यांनीं गुंफलें आहे. १७ घातल
१८ काळाग्नीच्या. १९ फडफडावते. २० सहज. २१ भागासहित. २२ भागरहि

Scanned by CamScanner

आनंद ना [1]निरानंदु । एक ना विविधु ।
मुक्त ना बद्धु । आत्मपणें ॥६१॥ अ. १३।११११

तें परम तत्त्व पार्था । होती ते सर्वथा ।
जे [2]आत्मानात्मव्यवस्था-। राजहंस ॥६२॥ अ. १३।११४३

ऐसेनि जे [3]निजज्ञानी । खेळत सुखें त्रिभुवनीं ।
जगद्रूपा मनीं । सांठऊनि मातें ॥६३॥ अ. १०।११७

हें विश्वचि माझें घर । ऐसी [4]मति जयाची स्थिर ।
[5]किंबहुना [6]चराचर । आपण जाहला ॥६४॥ अ. १२।२१३

मग याहीवरी पार्था । माझिया भजनीं आस्था ।
तरी तयातें मी माथां । मुकुट करीं ॥६५॥ अ. १२।२१४

तो मी वैकुंठीं नसें । [7]वेळु एक भानुबिंबीं न दिसें ।
वरी योगियांचींही [8]मानसें । [9]उमरडोनि जाय ॥६६॥ अ. ९।२०७

परि तयांपाशीं पांडवा । मी हारपला [10]गिंवसावा ।
जेथ नामघोषु बरवा । करिती माझा ॥६७॥ अ. ९।२०८

कृष्ण विष्णु हरि गोविंद । या नामाचे [11]निखळ [12]प्रबंध
[13]माजीं आत्मचर्चा [14]विशद । [15]उदंड गाती ॥६८॥ अ. ९।२१०

जयांचिये वाचे माझे [16]आलाप । दृष्टी भोगी माझें चि रूप ।
जयांचें मन संकल्प । माझा चि वाहे ॥६९॥ अ. ९।४४५

माझिया कीर्तीविण । जयांचे [17]रिते नाहीं [18]श्रवण ।
जयां सर्वांगीं भूषण । माझी सेवा ॥७०॥ अ. ९।४४६

१ आनंदरहित. २ जे आत्मा व अनात्मा ह्यांची निवड करण्यांत राजहंसच. ३ आत्मज्ञानी. ४ बुद्धि. ५ फार काय सांगावें. ६ सजीव-निर्जीव सृष्टि. ७ एकवेळ. ८ मनें. ९ ओलांडून. १० शोधावा. ११ केवळ. १२ कविता; (ग्रंथ). १३ मध्ये. १४ स्पष्ट. १५ पुष्कळ. १६ कथा; गोष्टी. १७ रिकामे. १८ कान.

Scanned by CamScanner

ते पापयोनी हि [१]होतु का । ते [२]श्रुताधीतहि न होतु का ।
परी मजसी [३]तुकितां [४]तुका । तुटी नाहीं ॥७१॥ अ. ९।४४१

तें चि [५]भलतेणें भावें । मन मज आंतु येतें होआवें ।
आलें तरी [६]आघवें । मागील [७]वावो ॥७२॥ अ. ९।४४३

जैसे तंव चि वहाळ वोहळ । जंव न [८]पवती गंगाजळ ।
मग होऊन ठाकती केवळ । गंगारूप ॥७३॥ अ. ९।४५८

तैसे क्षत्री वैश्य स्त्रिया । कां शूद्र [९]अंत्यजादि इया ।
जाती तंव चि वेगळालिया । जंव न पवती मातें ॥७४॥ अ. ९।४६०

यालागीं पापयोनीहि अर्जुना । कां वैश्य शूद्र [१०]अंगना ।
मातें भजतां सदना । माझिया येती ॥७५॥ अ. ९।४७१

पैं भक्ति एकी मी जाणें । तेथ [११]सानें थोर न म्हणें ।
आम्ही भावाचे पाहुणे । [१२]भलतेया ॥७६॥ अ. ९।३९५

[१३]येर पत्र पुष्प फळ । हें भजावया [१४]मिस केवळ ।
वांचूनि आमुचा [१५]लाग [१६]निष्कळ । भक्तितत्त्व ॥७७॥ अ. ९।३९६

मग [१७]भूतें हे भाष विसरला । जे [१८]दिठी मी चि आहें [१९]सूदला ।
म्हणौनि निर्वैर जाहला । सर्वत्र भजे ॥७८॥ अ. ११।६९८

हें समस्तही श्रीवासुदेव । ऐसा [२०]प्रतीतिरसाचा वोतला भाव ।
म्हणौनि भक्तांमाजीं राव । आणि ज्ञानिया तो चि ॥७९॥ अ. ७।१३६

तूं मन हें मीचि करीं । माझिया भजनीं प्रेम धरीं ।
सर्वत्र नमस्कारीं । मज एकातें ॥८०॥ अ. ९।५१९

१ असेनात का. २ ऐकून व पढून विद्वान झालेले. ३ तुलना केली असतां. ४ तोलाला. ५ कोणत्याही. ६ सगळें
७ यर्थ. ८ पावती. ९ हरिजन; (महार). १० स्त्रिया. ११ लहान. १२ कोणासहि. १३ इतर. १४ निमि
१५ संबंध; (आवड; प्रीति). १६ शुद्ध. १७ प्राणिमात्र. १८ दृष्टीनें. १९ घातला. २० स्वानुभवा

Scanned by CamScanner

माझेनि [1]अनुसंधानें देख। संकल्पु जाळणें [2]नि:शेख।
[3]मद्याजी चोख। याचि नांव ॥८१॥ अ. ९।५१८

ऐसा मियां [4]आथिला होसी। तेथ माझियाचि स्वरूपा पावसी।
हें अंत:करणीचें तुजपासीं। बोलिजत असें ॥८२॥ अ. ९।५१९

तूं मन बुद्धि [5]साचेंसी। जरी माझिया स्वरूपीं अर्पिसी।
तरी मातें चि गा पावसी। हे माझी [6]भाक ॥८३॥ अ. ८।७९

अथवा हें चित्त। मनबुद्धीसहित।
माझ्या हातीं [7]अचुंबित। न शकसी देवों ॥८४॥ अ. १२।१०४

तरी गा ऐसें करीं। यया आठां [8]पहारांमाझारीं।
[9]मोटकें [10]निमिषभरी। देतु जाय ॥८५॥ अ. १२।१०५

मग जें जें का निमिख। देखेल माझें सुख।
तेतुलें [11]अरोचक। विषयीं घेईल ॥८६॥ अ. १२।१०६

[12]पुनवेहूनि जैसें। शशिबिंब [13]दिसेंदिसें।
हारपत [14]अंवसे। नाहीं चि होय ॥८७॥ अ. १२।१०८

तैसें भोगाआंतूनि निगतां। चित्त मजमाजीं रिगतां।
हळूहळू पंडुसुता। मीचि होईल ॥८८॥ अ. १२।१०९

म्हणौनि अभ्यासासी कांहीं। सर्वथा [15]दुष्कर नाहीं।
यालागिं माझ्या ठायीं। अभ्यासें मीळ ॥८९॥ अ. १२।११३

कां जें यया मनाचें एक [16]निकें। जें देखिले गोडीचिया [17]ठाया [18]सोके।
म्हणौनि अनुभवसुखचि [19]कवतिकें। दावीत जाईजे ॥९०॥ अ. ६।४२०

---

१ ध्यानानें. २ संपूर्ण. ३ माझें यजन करणारा. ४ (माझ्या योगानें) संपन्न. ५ खरेपणानें. ६ शपथ. ७ समग्र. ८ प्रहरांमध्यें. ९ अल्प. १० क्षणभर. ११ अरुचि. १२ पौर्णिमेपासून. १३ दिवसेंदिवस. १४ अमावास्येला. १५ कठिण. १६ चांगलें. १७ ठिकाणीं. १८ सवकतें. १९ कौतुकानें.

Scanned by CamScanner

बळियें इंद्रियें [1]येती मना । मन [2]एकवटे पवना ।
पवन सहजें गगना । मिळोंचि लागे ॥९१॥ अ. ६।४५

ऐसें नेणों काय [3]आपैसें । तयातेंचि कीजे अभ्यासें ।
समाधि घर पुसे । मानसाचें ॥९२॥ अ. ६।४५

ऐसा जो कामक्रोधलोभां । [4]झाडी करूनि ठाके उभा ।
तो चि येवढिया लाभा । [5]गोसावी होय ॥९३॥ अ. १६।४५

पाहें पां ॐ तत्सत् ऐसें । हें बोलणें तेथ नेतसे ।
जेथूनि का हें प्रकाशे । [6]दृश्यजात ॥९४॥ अ. १७।४०

सुवर्णमणि सोनया । ये [7]कल्लोळु जैसा पाणिया ।
तैसा मज धनंजया । शरण ये तूं ॥९५॥ अ. १८।१४०

म्हणौनि मी होऊनि मातें । सेवणें आहे [8]आयितें ।
तें करीं हाता येतें । ज्ञानें येणें ॥९६॥ अ. १८।१४०

यालागीं [9]सुमनु आणि शुद्धमति । जो अनिंदकु अनन्यगति ।
पैं गा गौप्यहि परी तयाप्रति । [10]चावळिजे सुखें ॥९७॥ अ. ९।४

तरी प्रस्तुत आतां गुणीं [11]इहीं । तूं वांचून आणिक नाहीं ।
म्हणौनि गुज तरी तुझ्या ठायीं । लपवूं नये ॥९८॥ अ. ९।४

ते हे मंत्ररहस्य गीता । मेळवी जो माझिया भक्ता ।
[12]अनन्यजीवना माता । बाळका जैसी ॥९९॥ अ. १८।१५१

तैसी भक्तां गीतेसी । भेटी करी जो आदरेंसी ।
तो देहापाठीं मजसीं । येकचि होय ॥१००॥ अ. १८।१५१

---

१ वश होतात. २ मिळून जातें. ३ आपोआप. ४ नाहींसें करून. ५ धनी. ६ सर्व दृ… (दिसणारे) पदार्थ. ७ लाट. ८ सहजच. ९ चांगल्या मनाचा. १० सांगावें; बोला… ११ ह्या (गुणांनीं). १२ ज्याला जीवनास अन्य साधन नाहीं अशा (बालकास).

Scanned by CamScanner

ऐसें [1]सर्वरूपरूपसें । सर्वदृष्टिडोळसें ।
सर्वदेशनिवासें । बोलिलें श्रीकृष्णें ॥१०१॥ अ. १८।१४१७

हें शब्देंविण संवादिजे । इंद्रियां नेणतां भोगिजे ।
बोलाआदि [2]झोंबिजे । [3]प्रमेयासी ॥१०२॥ अ. १।५८

जें [4]अपेक्षिजे विरक्तीं । सदा अनुभविजे संतीं ।
सोऽहंभावें पारंगतीं । रमिजे जेथ ॥१०३॥ अ. १।५३

हें गीतानाम विख्यात । सर्व वाङ्मयाचें [5]मथित ।
आत्मा जेणें हस्तगत । रत्न होय ॥१०४॥ अ. १८।१३२३

वत्साचेनि [6]वोरसें । दुभतें होय घरोद्देशें ।
जालें पांडवाचेनि [7]मिषें । जगदुद्धरण ॥१०५॥ अ. १८।१४६७

आतां विश्वात्मकें देवें । येणें वाग्यज्ञें तोषावें ।
तोषोनि मज द्यावें । [8]पसायदान ॥१०६॥ अ. १८।१७९३

जे [9]खळांची [10]व्यंकटी सांडो । तयां सत्कर्मीं [11]रति वाढो ।
भूतां परस्परें पडो । मैत्र जीवाचें ॥१०७॥ अ. १८।१७९४

तेथ म्हणे श्रीविश्वेशरावो । हा होईल [12]दानपसावो ।
येणें वरें ज्ञानदेवो । सुखिया झाला ॥१०८॥ अ. १८।१८०१

धरोनि सद्भावाची [13]अंजुळी । मियां [14]वोवियाफुलें मोकळीं ।
अर्पिलीं [15]अंघ्रियुगुलीं । विश्वरूपाच्या ॥१०९॥ अ. ११।७०८

इति श्री स्वामी स्वरूपानंदसंपादितं श्रीभावार्थदीपिका-सार-स्तोत्रं संपूर्णम् ।

हरये नमः । हरये नमः । हरये नमः । श्रीकृष्णार्पणमस्तु ।

---

१ सर्व रूपांच्या योगानें जो रूपवान् आहे अशा श्रीकृष्णानें. २ भिडावें; आकलन करावें. ३ तत्त्वार्थाला. ४ इच्छावें. ५ सार, रहस्य (लोणी). ६ पान्हाने; प्रेमानें. ७ निमित्तानें. ८ प्रसाद. ९ दुर्जनांची. १० वक्रदृष्टि; कुटिलपणा. ११ आवड. १२ दान-प्रसाद. १३ ओंजळ. १४ ओंव्या हींच फुलें. १५ दोन्ही पायांवर.

Scanned by CamScanner